| MHOS130000792017 | **रे. मु. नं. ४७/२०१७ मधील निशाणी क्र.३० वरील आदेश** <br> **(चंद्रकांत लक्ष्मण महाजन वि विठ्ठल लक्ष्मण महाजन व इतर)** <br> *CNR No. MHOS13-000079-2017* |
|---|---|

**१.** प्रतिवादी क्र.२ ने प्रस्तुत अर्ज त्याच्या विरूद्ध दि.११.०७.२०१७ रोजी विना कैफियत झालेला हुकूम रदद करून कैफियत स्वीकारणेसाठी दाखल केला आहे.

**२.** प्रतिवादी क्र.२ चे म्हणणे आहे की, तो अपंग असुन त्यास प्रस्तुत दाव्यासंबंधी महत्वाची कागदपत्रे व पुरेशी माहिती हस्तगत करू शकला नाही, म्हणून सदर प्रतिवादी हा प्रस्तुत दाव्यास वेळेत कैफियत देवू शकला नाही. म्हणून न्यायालयाने या प्रतिवादीविरूद्ध दि.११.०७.२०१७ रोजी विना कैफियत चालविण्याचा हुकूम केलेला आहे. या प्रतिवादीस दाव्यासंबंधीची कागदपत्रे मिळताच आपली कैफियत दाखल केलेली आहे. प्रतिवादीने विनाकारण आपली कैफियत दाखल करण्याचे टाळले नाही. सदर प्रकरण हे स्थावर मिळकतीसंबंधीचे आहे. प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादीसे हितसंबंध गुंतलेले आहेत. म्हणून या प्रतिवादीविरूद्ध दि.११. ०७.२०१७ रोजी विना कैफियत झालेला हुकूम रदद करून सोबतची कैफियत स्वीकारणे योग्य व न्याय आहे. तसे न केल्यास प्रतिवादीचे कधीही पैशात न भरून येणार नुकसान होणार आहे. या प्रतिवादीस त्याच्या न्याय हक्कापासून वंचित व्हावे लागणार आहे.

**३.** प्रस्तुत अर्जावर वादीचे म्हणणे घेण्यात आले. त्यांनी त्यांच्या म्हणण्यात सदर प्रकरणात प्रतिवादी क्र.२ ने जाणीवपुर्वक कैफियत व म्हणणे दाखल केले नाही. तसेच तारखेस जाणीवपुर्वक हजर होत नाही. सदरचा अर्ज हा खोटा व बनावटी असून कारणही विसंगत आहे. याकरीता अर्ज नामंजुर करावा अथवा हेवी कॉस्ट आकारण्यात यावी अशी विनंती केली.

**४.** मी प्रतिवादी क्र.२ व वादी यांचे विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. वादी व प्रतिवादी यांच्यामधील प्रस्तुत दावा वाटपाचा व घोषणेचा असल्यामुळे वादी व प्रतिवादी यांना त्याचे म्हणणे मांडण्याची समान संधी देणे आवश्यक आहे. त्यावरून

दावा गुणदोषावर निकाली काढणे सोयीस्कर होईल. तसेच प्रतिवादीची म्हणणे ऐकूण घेवून त्यांना कैफियत देण्याची संधी देणे नैसर्गिक न्यायास धरुन होईल. झालेल्या विलंबाबाबत वादीला योग्य तो खर्च देवून प्रस्तुत अर्ज मंजुर करणे योग्य दिसते. सबब, खालील आदेश :—

**आ दे श**

**१)** प्रतिवादी क्र.२ चा **नि.३०** वरील अर्ज वादीला ३००/— खर्च देवून मंजूर करण्यात येतो व त्यांची कैफियत अभिलेखावर घेण्यात येते.

स्वाक्षरीत/—

दिनांक : १२/११/२०२१.

**(डॉ. डी. जी. पटवे)**
२रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
भूम.

**Certificate**

I affirm that, the contents of this P.D.F. file judgment are same, word to word, as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | ... | Smt. Rani H. Botre (Stenographer Grade-3) |
| Court | ... | $2^{nd}$ Jt.CJJD &JMFC Bhoom |
| Date | ... | 12-11-2021 |
| Order signed by the Presiding Officer on | ... | 12-11-2021 |
| Order uploaded on | ... | 12-11-2021 |